**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०१ ची साक्ष</u>**

**मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,**

**<u>आरोपी क्र. १ ते ६ तर्फे पुढील उलट तपास विधिज्ञ श्री.एस.एन.भणगे यांचेमार्फत</u>**

९. पंचनाम्याने आम्ही पोलीसांना वायरलेस सेट, फिश फाइंन्डर, इंजिन मॉनिटर, डिझेलचे दोन बॅरेल, जीपीएस सेट, तुटलेली पर्ससिन नेट, हायड्रालिंक विंच ( यापुढे या वस्तुना वरील वस्तु असे संबोधण्यात येत आहे ) हे सर्व साहित्य पोलीसांना दिलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर नमूद केलेला मुद्देमाल आजरोजी कोर्टासमोर हजर नाही. वरील वस्तु आम्ही दि. ३०/१०/२०२३ रोजी पोलीसांना दिलेल्या होत्या. सदर पंचनाम्याच्या वेळेस दोन पंच त्यापैकी एक तलाठी रेवंडी सर्जेकोट व दुसरे आजगावकर हे होते. वरील वस्तु हया पोलीसांना मी पंचासमक्ष दिलेल्या होत्या. वरील वस्तु जप्त केल्यानंतर पोलीसांनी त्याच्यावर सहयाचे लेबल चिटकविले.

१०. एम.ओ.नं. १ ते ५ यांचा पंचनामा सर्जेकोट बंदरावर ट्रॉलर उभे असताना व मी त्या ठिकाणी हजर होतो असे काही घडले नाही. सर्जेकोट बंदरावर पंचनामा झाल्यानंतर घटनास्थळावर गेलो असे काही घडलेले नाही. साक्षीदारास पंचनाम्यासोबत दाखल केलेले दोन फोटोग्राफ दाखविण्यात आले. सदरचे फोटो उलट तपासादरम्यान साक्षीदारास दाखविण्यात आल्याने सदर फोटोना **<u>अर्टीकल -१/पीडब्ल्यू१, व अर्टीकल २/पीडब्ल्यू१</u>** देण्यात येते. अर्टीकल १/पीडब्ल्यू१ व अर्टीकल २/पीडब्ल्यू१ मध्ये जे ट्रॉलर दिसत आहेत ते लाड यांच्या उमरसुलेमान क्र. आयएनडीएमएच्-४-एमएम-१५१३ हे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, अर्टीकल १/पीडब्ल्यू१ व अर्टीकल २/पीडब्ल्यू१ मध्ये ट्रॉलर हा सर्जेकोट बंदराव उभा असलेला दिसत आहे. हे म्हणणे खरे आहे की, पर्ससिन बोटीला फिशरी डिपार्टमेंटची परवानगी घेणे आवश्यक आहे, त्याशिवाय मासेमारीकरीता जाता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मासेमारी करण्यासाठी निघताना त्याची नोंद फिशरी डिपार्टमेंटला द्यावी लागते.

प्रश्न - दि. २८/१०/२०२३ व दि. २९/१०/२०२३ रोजी तुमची बोट चिन्मय प्रसाद मासेमारीसाठी गेली होती अशी नोंद फिशरी डिपार्टमेंटमध्ये नाही ?
उत्तर - तशी नोंद करायची गरज पडत नाही.

११. मला माझ्या चिन्मयप्रसाद या बोटीबाबत आवागमन व इतर माहिती आहे. तसेच मला उमरसुलेमान बाबत कोणतीही माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, बोटीचा नोंदणी परवाना व पर्ससिन मासेमारीकरीता परवाना असे दोन परवाने घ्यावे लागतात. हे म्हणणे खरे आहे की,

ऑक्टोबर २०२३ मध्ये माझ्या चिन्मयप्रसाद बोटीच्या परवान्याचे नुतणीकरण झालेले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, सहाय्यक मत्सव्यवसाय विकास अधिकारी (परवाना अधिकारी) मालवण यांनी मला बोटीचे नुतणीकरण होणार नसल्याचे लेखी कळविले होते. माझ्या म्हणण्यानुसार माझ्याकडे हायड्रोलिंक विंच आहे. हे म्हणणे खरे नाही की, अधिसुचना क्र. ६ प्रमाणे हायड्रालिंक विंच वापरण्यास मनाई आहे. हे म्हणणे खरे आहे की, मु.स.भालेकर हे सहाय्यक मत्सव्यवसाय विकास अधिकारी (परवाना अधिकारी) मालवण होते, त्यांनाच परवाना देण्याचा अधिकार होता. हे म्हणणे खरे आहे की, मु.स.भालेकर, सहाय्यक मत्स विकास अधिकारी (परवाना अधिकारी) मालवण यांनी पोलीस निरिक्षक मालवण यांनी विचारलेल्या प्रश्नावलीनुसार दि. ३०/११/२०२३ रोजी दिलेले उत्तरामध्ये मला बोटीच्या परवान्याबद्दल विचारण्यात आलेल्या प्रश्नांचे उल्लेख आहे. सदरचे पत्र साक्षीदारास उलट तपासादरम्यान दाखविण्यात आल्याने त्यास **अर्टीकल ३/पीडब्ल्यू१** दिले आहे.

१२. मी कांचन एकनाथ कुमठेकर उर्फ प्रतिक राजन तांडेल जे पीएसआय होते व सागरी सुरक्षामध्ये एन्चार्ज होते त्यांना मी ओळखत नाही. हे म्हणणे खरे नाही की, कांचन एकनाथ कुमठेकर हे माझे नातेवाईक आहेत. हे म्हणणे खरे आहे की, समुद्रामध्ये चतु:सिमा असण्याचा प्रश्न येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, एखादी वस्तु समुद्रामध्ये उभी नसेल तर त्याची चतु:सिमा सांगता येणार नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, समुद्राची खोली जीपीएसने मोजता येते. हे म्हणणे खरे आहे की, जीपीएस हे छोटी वस्तु असून ती सहज हाताळता येते. हे मी सांगू शकत नाही की, पोलीसांनी समुद्राची खोली जीपीएसने मोजली किंवा कसे. माझ्या म्हणण्यानुसार ज्या वेळी पोलीसांनी समुद्राची खोली मोजली त्यावेळी मी त्या ठिकाणी हजर होतो. पोलीसांनी माझ्या समक्ष समुद्राची खोली जीपीएसने मोजली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलीसांना हेतूपुरस्सर खोली जीपीएसने मोजू दिली नाही. हे म्हणणे खरे आहे की, मला मिळालेल्या माहितीनुसार कथीत घटनास्थळावर २५ ते ३० माणसे होती. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत केसमध्ये २५ आरोपी नाहीत. साक्षीदारास हजर असलेल्या आरोपींपैकी एक आरोपी दाखविण्यात आला. त्याचे नाव अक्षय पवार असे आहे असे साक्षीदाराने सांगितले. हे म्हणणे खरे आहे की, मी प्रत्येक आरोपीला घटनेपुर्वी नावानिशी ओळखत होतो. आरोपी हे तळाशिल येथील राहणारे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी हे पांरपारिक मासेमारी करणारे आहेत. आरोपींपैकी कोणाकडे पर्ससिन बोट आहे हे मला माहित नाही. आरोपी हे पर्ससिन बोटने मासेमारी करतात असे माझे म्हणणे नाही. हे म्हणणे खरे आहे की, पर्ससिन मासेमारी व पारंपारीक मासेमारी यांच्यामध्ये वाद आहेत. हे म्हणणे खरे नाही की, पर्ससिनवाले कायदयाने दिलेल्या परवान्याच्या आतमध्ये येवून मासेमारी करतात

व पारंपारिक मच्छीमारी करणाऱ्या लोकांच्या पोटावर पाय आणतात हा वाद आहे. हे म्हणणे खरे नाही की, पर्ससिन मासेमारी ही १३ वावच्या आतमध्ये मासेमारी करतात म्हणून पारंपारीक व पर्ससिन मासेमारी यांच्यामध्ये वाद आहेत. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, पर्ससिनधारक हे १३ वावच्या बाहेर जावून मासेमारी करतात आणि परवाना देताना त्यांना १३ वावच्या बाहेर मासेमारी करण्याची अट घालण्यात येते.

आरोपींच्या विधिज्ञांच्या तोंडीविनंतीवरुन साक्षीदाराचा उलट तपास पुढील तारखेपर्यंत तहकूब.

श्रवणोत्तर स्वीकृत

दि. ०९/१२/२०२५

एम.के.फकीह
न्यायदंडाधिकारी वर्ग - १ मालवण.